उपसंहार

# प्रकरण सहावे

## निष्कर्ष व सूचना

निष्कर्ष :

जनतेचा प्रशासनातील सहभाग वाढावा, त्यांना राजकीय प्रक्रियेचे धडे मिळावेत व प्रामुख्याने स्थानिक दैनंदिन प्रश्न स्थानिक पातळीवरच सोडविले जावेत ही अपेक्षा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून होती. पण आज निराशाजनक चित्र पहावयास मिळते. शहर विकास योजनांच्या अंमलबजावणीला महाराष्ट्रात अपेक्षित गती प्राप्त झालेली नाही. नियोजनाबाबत स्थानिक परिषदेची उदासिनता, व्यक्तींचे हितसंबंध, साधन संपत्तीची कमतरता इत्यादी अडचणी आहेत. नगरपरिषदांची हलाखीची आर्थिक परिस्थिती हे प्रमुख कारण आहे. त्यांचा उपलब्ध पैसा शहरी जीवन ` आहे तसे चालू ` ठेवण्यातच सर्व होतो.

या पार्श्वभूमीवर वाई नगरपालिकेच्या पाणी पुरवठा व आरोग्य सेवा या दोन महत्वाच्या सेवांचे अध्ययन केल्यानंतर पुढील निष्कर्ष काढता येतात.

१) १९०१ मध्ये शहराची असलेली लोकसंख्या व निर्वाचित सदस्यांची एकूण संख्या (८) तसेच १९८१ मध्ये शहराची असलेली लोकसंख्या व निर्वाचित सदस्यांची एकूण संख्या (२४) यामध्ये तिपटीने वाढ झाली आहे. म्हणजे प्रतिनिधित्वाचे प्रमाण वाढले आहे. शहराच्या दैनंदिन गरजा अधिक प्रभावीपणे सुटण्यास मदत होणार होती. परंतु हा अनुभव येत नाही. समस्या सुटण्याऐवजी त्यात भरच पडत असल्याचा अनुभव येत आहे.

२) नगराध्यक्ष व नगरपिते वरचेवर बदलणे ही गोष्ट लोकशाही प्रक्रियेचा एक भाग म्हणून स्विकारली तरी ज्या अधिका-यांवर नगरपालिकेच्या विविध योजना प्रत्यक्षात अमलात आणण्याची जबाबदारी असते. त्यांच्या बदल्या क्षुल्लक कारणावरुन केल्या जातात हे योग्य वाटत नाही. साधारणपणे किमान

तीन वर्षे अशा अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार नाहीत असे शासनाचे धोरण असावे.

३) पाणी पुरवठा योजनेच्या पहिल्या टप्प्याला मंजुरी (१९६५) व दुसऱ्या टप्प्याचा प्रत्यक्ष प्रारंभ (१९७५) यामध्ये दहा वर्षांचा कालावधी लोटला. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाच्या प्रश्नाकडे पाहण्याचा शासकीय दृष्टिकोन उदासीन होता व शासकीय लालफितीचा कारभार वेळकाढूपणाचा राहिला हे याचे उदाहरण आहे.

४)दुसऱ्या टप्प्याचे आराखडे तयार करताना शहरातील उंच-सखल भागाकडे लक्ष न दिल्यामुळे दुसऱ्या टप्प्यातही दोष तसेच राहिले. त्यामुळे संपूर्ण शहराला अपेक्षित व समप्रमाणात पाणी मिळण्याचा प्रश्न अजूनही तसाच रेंगाळत आहे. या बाबतीत नगरपालिकेने जबाबदारी योग्यप्रकारे पार पाळली नाही.

५) शहराच्या काही भागांना पूर्ण दाबाने भरपूर पाणी तर शहराच्या काही भागातील उदा. फुलेनगर, रविवार पेठेचा काही भाग, ढोर गल्ली, मुंगसे आळी, कळवात आळी, मुई आळी, विश्वकोश व प्राध्यापक कॉलनी, कुंभारवाडा या भागातील लोकांना अत्यंत अपुरा पाणी पुरवठा होतो. शहराला पाणी पुरवठा करणे हेच एकमेव उद्दिष्ट नगरपालिकेसमोर असावे असे दिसते. मात्र शहरातील सर्व भागांना पाण्याचे वाटप न्यायोचित व समान पध्दतीने व्हावे असा दृष्टिकोन अभावानेच आढळतो.

६) पाणी पुरवठा योजनेसाठी कर्ज काढण्यास परवानगी मागणारा अर्ज नगरपालिकेला पुन्हा पुन्हा करावा लागला. शासनाकडून मिळणाऱ्या हिश्यालाही शासनाने मान्यता दिलेली नव्हती. शासनाने देखील जबाबदारी नीटपणे पार पाडली नाही. शासकीय दृष्टिकोन उदासीनतेचा होता.

७) मीटर पध्दती सुरू करण्याआधी नगरपालिकेने योग्य खबरदारी घेतली नाही. त्यामुळे मीटर पध्दतीही अपयशी ठरली आहे. मीटर दुरूस्तीची कोणतीही सोय नगरपालिकेकडे नाही. मीटरबाबत अनेक तक्रारी येऊ लागल्या.

८) मेनलाईनवर नळ कनेक्शन्स देण्यामुळे पूर्ण दाबाने पाणी पुरवठा होणार नाही याची कल्पना नगरपालिकेला आली नाही. यावर मात करण्यासाठी मेनलाईनला पर्यायी सबलाईन टाकणे आवश्यक असेले तरी ही बाब नगरपालिकेच्या आर्थिक कुवतीबाहेर असल्याचे निदान आज तरी दिसते.

९) दुसरा टप्पा कार्यान्वित झाल्यानंतर दर माणसी दर दिवशी ९० लिटर्स पाण्याचा पुरवठा होणे आवश्यक होते. तथापि एका अनुमानानुसार तो केवळ दरमाणसी दरदिवशी ४० ते ५० लिटर्स होत आहे. याचा अर्थ असा होतो की, नदीच्या पात्रातून २४ लाख लिटर्स पाणी उपसले जात नाही किंवा उपसले जात असेल तर ते शहरातील सर्व नागरिकांना सम प्रमाणात मिळत नाही. म्हणजे पाणी वाटप योजनेतच काही दोष आहेत हे सिध्द होते.

१०) पाणी पुरवठा केंद्राच्या नैसर्गिक शुध्दिकरण यंत्रणेची नियमित साफसफाई होणे आवश्यक आहे. परंतु नगरपालिकेने याबाबत चालढकल व निष्काळजीपणा दाखवल्याने वेळोवेळी पात्रातून पाणी सरळ जॅकवेलमध्ये घेण्याची पाळी नगरपालिकेवर येत आहे. परिणामी पाणी पुरवठयातील दूषितांचे प्रमाण किमान १२ टक्क्यांपासून ६२ टक्क्यांपर्यन्त आढळले आहे.

११) पाणी शुध्दीकरणासाठी टी.सी.एल. पावडरचा उपयोग केला जातो. ती पावडर नीटपणे ठेवली जात नाही असे निदर्शनास आले. ही पावडर हवाबंद खोलीत ठेवणे आवश्यक आहे. हवेतील कार्बन-डाय-ऑक्साइड वायूचा पावडरशी संयोग होऊन पावडरमधील क्लोरीन वायू निघून जातो. व उरतो तो विरी गेलेला चुना. ही क्लोरीन विरहित पावडर पाणी शुध्द करण्यास सक्षम नसते व पावडरसाठी झालेला खर्च हा वाया जातो.

१२) वाईतील वैद्यकीय व्यवसायिकांच्या मते शहरामध्ये आढळणारे काविळीसारख्या व अशुध्द पाण्यामुळे होणाऱ्या आजारांचे प्रमाण अधिक असण्याचे कारण अशुध्द व अस्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा हे आहे.

१३) वाईतील एका जेष्ठ वैद्यकीय व्यवसायिकाच्या मते, शहरातील पाणी पुरवठयात दोष निर्माण होण्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे, धोम धरण ते वाई दरम्यानच्या नदीच्या प्रवाहालगत दोन्ही बाजूंना असलेली बरीच शेत जमीन ओलिताखाली आणली जाते. प्रचलित पध्दतीनुसार रासायनिक खतांचा, किटकनाशकांचा भरपूर वापर वाढत्या प्रमाणात होत आहे. त्याचप्रमाणे उपलब्ध पाणी देखील वारेमाप पध्दतीने वापरले गेल्याने जमिनीत न शोषली गेलेली रासायनिक द्रव्ये पाण्याच्या झिरप्याबरोबर नदीच्या पात्रात मिसळली जातात. ही क्रिया वर्षांनुवर्षे घडत असून तिचे प्रमाण वाढते आहे. वाईच्या पाणी पुरवठयात अशुध्दता निर्माण करणारा हा महत्वाचा घटक वैद्यकीय व्यावसायिकांना वाटतो.

१४) नियमानुसार नगरपालिकेने शहराला ज्या पाण्याचा पुरवठा करावयाचा असतो त्याचे नमुने विवक्षित प्रमाणात शासकीय तपासणी प्रयोग-शाळांकडे पाठवावयाचे असतात. परंतु वाई नगरपालिका याबाबतीत जागरूक नसल्यामुळे पाण्याचे नमुने योग्य प्रमाणात पाठविले जात नसल्याबद्दलची तक्रार शासनाकडून पूर्वी करण्यात आलेली आहे. शासनाकडून वेळोवेळी पाणी तपासणी झाल्यानंतरचा अहवाल पाठविण्यात आल्यानंतर त्यातील सूचनांची दखल नगर-पालिकेने घेतल्याचे दिसत नाही.

१५) पाणी पुरवठा योजना सुरू झाल्यापासून शहराचा भौगोलिक विस्तार वाढतो आहे. लोकसंख्येतही भर पडत आहे. साहजिकच नळ कनेक्शन्सची मागणीही वाढत आहे. तथापि ही वाढती मागणी पूर्ण करणे नगरपालिकेला

शक्य होत नसल्याचे दिसते. कारण दूरदृष्टीने भविष्यात निर्माण होणाऱ्या मागणीचा अंदाज घेऊन योजना तयार करणे, त्यासाठी साधनांची उपलब्धता निर्माण करणे हे काम नगरपालिकेला साध्य झालेले नाही.

१६) शासनाच्या पाटबंधारे खात्याने नगरपालिकेशी केलेल्या कराराच्या स्वरूपावरून असे मत बनते की, नागरी भागाला पाणी पुरवठा करण्याच्या जबाबदारीपेक्षा शेतीला पाणी पुरवठा करण्याच्या कामाला शासन प्राधान्य देऊ इच्छिते व नगरपालिकादेखील शासनाशी बोटचेपेपणाने वागते.

१७) नदीच्या पात्रातून पाणी पुरवठा करण्याच्या योजनेला पूरक स्वरूपात विंधन विहिरीद्वारे पाणी पुरवठा करण्याची योजना कार्यान्वित झालेली आहे. परंतु त्यांचे वाटप विचारात घेता ते शहरातील लोकांच्या पाण्याच्या गरजेनुसार झाल्याचे दिसत नाही. काही ठराविक विभागातच उदा. फुलेनगर, रविवार पेठ, गंगापूरी इत्यादी भागात या विंधन विहिरी आहेत. त्यामुळे दुर्गम भागाला पाणी पुरवठा होण्याच्यादृष्टीने विंधन विहिरींची योजना करता येणे शक्य होते परंतु तसे घडले नाही.

१८) पाणी पुरवठयाच्या संदर्भात नगरपालिकेकडे नळाला पाणी न येणे, अपुरे, कमी दाबाने, अनियमित येणे, मीटर रिडींग चुकीचे असणे अशा अनेक तक्रारी सामुदायिक वा वैयक्तिकपणे आलेल्या आहेत. साधारणपणे तक्रार न नोंदविण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती लक्षात घेता तक्रारींचे प्रमाण याहूनही जास्त असावे असे मानावयास जागा आहे.

१९) पाणी पुरवठयाचे संघटन हे देखील दोषपूर्ण आढळते. त्यात विस्कळीतपणा बऱ्याच प्रमाणात आहे. उदा. शहराच्या विविध मार्गांना योग्य दाबाने पाणी पुरवठा होण्यासाठी कोणत्यावेळी व किती कालावधीसाठी पाणी सोडणे आवश्यक आहे हा विचार योग्यप्रकारे झाल्याचे दिसत नाही. या संदर्भात

एका नगरसेवकाने दिलेल्या माहितीनुसार विविध भागात विशिष्ट क्रमाने पाणी सोडल्यास पाणी पुरवठयात परिणामकारक सुधारणा करणे शक्य आहे.

२०) तक्ता क्र.४.३ वरून असे आढळते की, १९६९ ते १९७४-७५ या कालावधीत नगरपालिकेला पाणी पुरवठा करण्याच्या कामी नफा होत असे. (अपवाद वर्ष १९७०-७१) हे स्वाभाविक वाटते. कारण सुरूवातीला झालेला मांडवली खर्च व कर्मचा-यांच्या नियुक्तीवरील खर्च हा जादा कनेक्शन्स देण्यामुळे विभागला जाऊ लागला. कनेक्शन्सची संख्या मर्यादित असल्यामुळे वसूलीचे काम हे परिणामकारक होत असे. तसेच सुरूवातीला कनेक्शन्स घेणा-यांची आर्थिक स्थिती ब-यापैकी असल्याचे गृहित धरण्यास हरकत नाही. परंतु १९७५ नंतर मात्र दुस-या टप्प्याच्या प्रारंभानंतर नळ कनेक्शन्सची संख्या मोठया प्रमाणावर वाढणे, दूरवरच्या भागात पाणी पुरवठा करण्यासाठी पाईप लाईन्सचा खर्च वाढणे, कर्मचा-यांच्या संख्येत वाढ होणे, त्यांचे पगार व भत्ते इत्यादीपोटी आवर्ती खर्च वाढत राहिल्यामुळे तसेच वसूलीच्या कामात कार्यक्षमता कमी झाल्यामुळे १९७६ ते आजतागायत नगरपालिकेची पाणी पुरवठा योजना तोटयात चालत असल्याचे दिसते.

२१) नगरपालिकेचे हिशोब १९७४ पासून नीट न ठेवल्याने नगरपालिकेला मंजूर झालेली ५५ लाख रूपये खर्चाची पाणी पुरवठा योजना शासनाच्या बासनात बंदिस्त आहे. या बाबतीत योग्य उपाययोजना न झाल्यास ही संपूर्ण योजनाच शासन रद्द करील अशी भीती आहे.

२२) उपरोक्त तांत्रिक निष्कर्षांव्यतिरिक्त एक सामाजिक स्वरूपाचा निष्कर्ष काढता येतो. पाणी पुरवठा योजनेचे महत्व कालांतराने लोकांना उमगले आणि त्यांचा विरोध संपुष्टात आला. परंपरागत विचारांचा पगडा असलेला समाज सुरूवातीच्या काळात नवीन सुधारणांना विरोध करीत असला, अथवा त्या सुधारणांविषयी साशंक असला तरी कालांतराने जीवनाच्या अन्य क्षेत्रात

अपरिहार्यपणे घडून येत असणाऱ्या परिवर्तनाचा स्विकार करु लागतो. ज्या सुधारणांना त्याने एकेकाळी विरोध केलेला असतो, त्या सुधारणा तो क्रमशः स्विकारण्यास तयार होतो. पारंपारिक विचारांचा पगडा असलेला समाज देखील उपयुक्ततेचाच निकष सर्व व्यवहारांना लावतो हेच दिसून येते.

२३) पाणी पुरवठयाच्या प्रश्नाप्रमाणेच नगरपालिकेच्या आरोग्य विषयक सेवांबाबत स्वातंत्र्यपूर्व काळात देखील तत्कालीन शासन व जिल्हा लोकल बोर्ड या संस्था उदासीन असल्याचे निदर्शनास येते. उदा. नगरपालिकेच्या दवाखान्याची इमारत मोडकळीस आल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर देखील त्याबाबतीत बोर्डाकडून वा शासनाकडून कोणतीही मदत मिळू शकली नाही.

२४) आरोग्य सेवेबाबत असणारे विदारक चित्र पुढील तथ्यावरुन स्पष्ट होते. १८६५ ते १९७३ या १०८ वर्षांच्या कालावधीत एका वैद्यकीय अधिकाऱ्या व्यतिरिक्त १ कंपाऊंडर, १ कारकून व २ शिपाई या व्यतिरिक्त नर्स, दाई, सफाई कामगार या आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्त करण्याची गरज नगरपालिका, शासन अथवा जिल्हा लोकल बोर्ड यांना वाटली नाही. याचे आश्चर्य वाटते. कारण दरम्यानच्या काळात ब्रिटिश राजवट जाऊन स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जिल्हा परिषदांची स्थापना होऊन एक तपाचा कालावधी उलटून गेलेला होता. १९७३ मध्ये एकमेव नर्सची नेमणूक झाल्याचे दिसते. आरोग्य सेवेचा गुणात्मक दर्जा वाढविण्याबाबत असलेली उदासिनताच निदर्शनास येते.

२५) नगरपरिषदेच्या आरोग्य सेवेचा लाभ शहरातील अल्प उत्पन्न गटातील लोकांना मिळणे गरजेचे असताना नगरपालिकेचा होणारा खर्च उत्पन्नाच्या प्रमाणात वाढत नसल्याचे आढळते. विशेषतः औषधे व साधन सामग्री आवश्यक असताना देखील तरतुदी अभावी त्यांची खरेदी होऊ शकत नसल्याची तक्रार संबंधित आरोग्य अधिकारी करीत असतात. नगरपालिकेच्या इतर विभागांवर

होणा-या खर्चाच्या तुलनेत हा खर्च अल्प असल्याचे निदर्शनास येते. या खर्चातही सातत्य आढळत नाही.

२६) नगरपालिका आपल्या रुग्णालयातही दर रुग्णामागे उपचारार्थ अत्यल्प खर्च करते. बहुतेक वेळा रुग्णांवर दरडोई झालेला खर्च हा रुग्णांकडून वसूल करण्यात येणा-या शुल्कापेक्षा देखील कमी असल्याचे आढळते. उदाहरणार्थ १९६८-६९, १९६९-७० व १९७४-७५ या वर्षी नगरपालिका रुग्णांकडून पंधरा पैसे नाममात्र फीस घेत असे. परंतु रुग्णावर होणारा हा खर्च मात्र अनुक्रमे १० पैसे, १२ पैसे व ८ पैसे इतका अत्यल्प होता.

२७) नगरपालिकेच्या रुग्णालयात सध्या एकच वैद्यकीय अधिकारी असून रोग्यांची संख्याही जास्त आहे. वास्तविक पहाता रोगांवर औषधोपचारा-बरोबरच प्रतिबंधात्मक दृष्टीने आरोग्य शिक्षणाचे कार्य या अधिका-याने करावे अशी अपेक्षा केली जाते. परंतु दुस-या मदतनीस डॉक्टरांच्या अभावी हे कार्य पार पाडले जाऊ शकत नाही.

२८) नगरपालिकेच्या दवाखान्यात अत्यंत साधी शस्त्रक्रिया वगळता इतर प्रकारच्या शस्त्रक्रियांची सोय उपलब्ध नसते. आवश्यक सुविधांच्या अभावामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यांना नाईलाजास्तव खाजगी रुग्णालयांचा आश्रय घ्यावा लागतो. हे अलिकडील काळात शहरात खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या वाढत असणा-या संख्येवरून दिसते.

२९) रुग्णालयाची इमारत ही सुमारे ५० वर्षांपेक्षा जुनी व मातीची असल्याने स्वच्छता राखण्यास कठीण जाते. त्याचप्रमाणे इमारतीतील खोल्यांपैकी कित्येक खोल्या वैद्यकीय अधिका-यांच्या निवासासाठी द्याव्या लागतात. कारण डॉक्टरांसाठी वेगळ्या निवासाची सोय नगरपालिकेने आवश्यक असूनही केलेली नाही. त्यामुळे सध्याची इमारत अपुरी पडते.

३०) कृष्णा नदीच्या पात्राच्या दोन्ही तीरांची स्वच्छता ठेवण्यासाठी ` कृष्णा कॅनलायझेशन स्कीम ` राबविली होती. परंतु ही योजना पुढे नगरपालिकेचे दुर्लक्ष झाल्यामुळे पूर्णत्वास जाऊ शकली नाही. ही योजना पूर्ण झाली असती तर पाण्याचे दूषितीकरण टळले असते. दुर्गन्धी व घाणीचे साम्राज्य नष्ट होण्यास मदत झाली असती.

३१) पाणी पुरवठा योजना सुरू होण्याआधी वाईकरांचीपाणी वापरण्याची प्रवृत्ती मर्यादित असल्याने फारसे सांडपाणी घराबाहेर येत नसे. सांडपाण्याचा निचरा परसदारी करण्याची पध्दती होती. परंतु नळ योजना सुरू झाल्यानंतर पाण्याचा वापर वाढणे स्वाभाविक होते. त्याची पूर्वकल्पना लक्षात घेऊन नगरपालिकेने पाणी पुरवठा योजना राबवण्या आधी सांडपाण्याचे नि:सारण सुयोग्य पध्दतीने होण्यासाठी गटारे बांधणे इत्यादी बाबत विचार करावयास हवा होता. परंतु तो तसा झाल्याचे दिसत नाही. गटारांची केवळ जुजबी डागडुजी करण्यावरच अद्यापही नगरपालिका खर्च करीत असताना दिसते.

३२) वाईतील गटारांची एकूण लांबी ७० कि.मी. व ती स्वच्छ ठेवण्यासाठी नेमलेल्या सफाई कामगारांची संख्या केवळ ११ लक्षात घेता, दर कामगाराला सरासरीने ६.३० कि.मी. गटार स्वच्छ करण्याची जबाबदारी येते. कोणताही कर्मचारी हे काम कार्यक्षमरित्या करू शकत नाही हे उघडच आहे. नगरपालिकेने सफाई कामगारांची पर्याप्त संख्येने नेमणूक केलेली नाही. परिणामी शहरातील गटारे महिनोमहिने तुंबलेली आढळतात. डासांचे व दुर्गन्धीचे प्रमाण वाढत आहे. याकडे अद्यापही नगरपालिकेचे लक्ष नाही.

३३) सर्वसाधारणपणे खाजगी मालकीचे पाटीचे व फ्लॅशचे मिळून ६९७ संडास ( Seats ) आहेत. या खाजगी मालकीच्या संडासांचा वापर प्रत्येकी दोन कुटुंबामध्ये होतो असे गृहित धरल्यास साधारणत: १४०० कुटुंबांना या संडासांचा उपयोग होतो. या कुटुंबातील व्यक्तींची संख्या दर कुटुंबात पाच

प्रमाणे धरल्यास ७,००० व्यक्तींची सोय झाल्याचे दिसते. २७,००० लोकसंख्येपैकी उर्वरित २०,००० लोकसंख्येला सार्वजनिक संडासाच्या प्रमाने १३२ (सिटस्) उपलब्ध आहेत. दर दहा व्यक्तींमागे १ सीट हे प्रमाण गृहित धरल्यास २,००० सीटसूची आवश्यकता असताना सध्या केवळ १३२ सीटसूची सोय नगरपालिकेने सार्वजनिकरित्या केलेली आहे. यावरून आवश्यकता व उपलब्धता यातील प्रचंड दरी निदर्शनास येते. परिणामी शहरातील अनेक वस्त्यांमध्ये रहिवासी उघड्यावरच मलमूत्र विसर्जन करतात. त्याचा अत्यंत प्रतिकूल परिणाम शहराच्या आरोग्यावर होणे अपरिहार्य आहे.

३४) पाटीच्या संडासाला पर्याय म्हणून फ्लशचे संडास बांधण्यास नगर-पालिकेने प्रोत्साहन दिल्याने बरेचसे संडास तशाप्रकारचे बांधले गेले. परंतु त्यासाठी नगरपालिकेने ठरवून दिलेल्या निश्चित आराखड्याप्रमाणे (स्पेसिफिकेशनप्रमाणे) टाक्यांचे बांधकाम होते किंवा नाही हे पाहिले न गेल्यामुळे ब-याचशा टाक्यांमधून मैलामिश्रीत पाणी सरळ गटारात सोडले जाते. सध्या वाईत भुयारी गटारे अस्तित्वात नसल्याने गटारातून येणा-या या मैल्याचा उपसर्ग शहराला होत आहे.

<u>सूचना</u> :

१) साधारणपणे किमान तीन वर्षे तरी मुख्याधिका-यांच्या बदल्या होणार नाहीत असे धारण शासनाने आखावे.

२) शास्त्रीय पध्दतीवर आधारित पाणी पुरवठा योजना राबविली जावी. तज्ज्ञ कर्मचा-यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक स्वरूपाची प्रयोगशाळा स्थापन करावी. टी.सी.एल. पावडरचे प्रमाण शास्त्रीयदृष्ट्या योग्य असावे. पाणी वाटपाच्या वेळात सुसूत्रीपणा आणून पाणी वाटप समान पध्दतीने होईल ही दक्षता घ्यावी.

३) मेनलाईन शेजारीच दुसरी सबलाईन टाकून त्यावरून नळ कनेक्शन्स देण्यात यावीत. त्यामुळे पाण्याच्या दाबावर प्रतिकूल परिणाम होणार नाही.

४) पुरविण्यात येणारी मीटर्स तांत्रिक दृष्टीने चांगल्या दर्जाची असावीत. त्यांची देखभाल व दुरूस्ती करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नगरपालिकेने नेमावा. सध्या काहीना मीटर पध्दती व काहीना फ्लॅटरेट पध्दती अशी दुहेरी आकारणी पध्दती अस्तित्वात आहे. त्याऐवजी क्रमाक्रमाने सर्वत्र मीटर पध्दतीच लागू करण्याचा कार्यक्रम नगरपालिकेने अमलात आणावा.

५) नदीच्या पात्रातून सध्या बऱ्याचदा जॅकवेलमध्ये सरळ पाणी घेतले जाते त्याऐवजी ते पाणी शुध्द करूनच जॅकवेलमध्ये घेण्याची व्यवस्था करावी.

६) नदीच्या पात्रातील पाण्यामध्ये साठणारे शेवाळे, गाळ, पालापाचोळा, पाणी शुध्दिकरण यंत्रणा व केंद्र नियमितपणे स्वच्छ केले जावे.

७) कृष्णा नदीच्या पात्रामध्ये, जॅकवेल जवळ पाण्याची पातळी जास्त रहावी, पात्रातील पाणी खाली वाहून जाऊ नये म्हणून काही अंतरावर कायम स्वरूपी कोल्हापूर पध्दतीचा बंधारा घातला जावा. पूर्वी शासनाशी झालेल्या करारातून नगरपालिकेला मुक्त केले जावे अशी मागणी नगरपालिकेने शासनाकडे करावी.

८) गटारे नाल्या इत्यादीमधून गेलेली नळ कनेक्शन्स काढून ती जमिनीच्या समपातळीवरून देण्यात यावीत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका पोहोचणार नाही.

९) नगरपालिकेला ठरवून दिलेल्या कोटयानुसार पाण्याचे नमुने तपासून घेतले जावेत.

१०) पाणी पुरवठयाबाबत निर्माण होणाऱ्या अडचणींची माहिती शहरातील नागरिकांना विश्वासात घेऊन देण्यात यावी. शहरातील डॉक्टर्स, शिक्षक, इंजिनिअर्स व अन्य प्रतिष्ठित नागरिक यांची एक कायम स्वरूपी समिती

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

नगरपालिकेने स्थापन करावी. त्यांची बैठक दरमहा घेऊन शासनाकडून तपासून आलेल्या पाण्यासंबंधीचा अहवाल बैठकीपुढे सादर करण्यात यावा. या समितीच्या सूचनांची अंमलबजावणी तत्परतेने करण्यात यावी.

११) भविष्यातील शहराची संभाव्य वाढ व भौगोलिक रचना लक्षात घेऊन करावयाच्या दूरगामी पाणी पुरवठयाचा आराखडा तयार करण्यात यावा. त्यासाठी लागणारी खर्चाची तरतूद टप्प्याटप्प्याने आतापासूनच करण्यात यावी.

१२ ) प्रत्येक ` क ` वर्ग नगरपालिकेला पाणी पुरवठयाच्या संदर्भात आवश्यक असणारा अभियंता स्वत: नेमणे सद्य:स्थितीत शक्य नसल्याने किमान जिल्हा पातळीवर सामाईक पध्दतीने असा अभियंता नेमणे शक्य वाटते. शासनाची या कामी मदत मिळविण्याचा प्रयत्न व्हावा.

१३) सध्या वाई शहरापासून नदीच्या वरच्या भागात शेतीसाठी वापरात येणा-या पाण्याचा झिरपा अधिक होत असल्याने नदीतील पाणी प्रदूषित होते. हे टाळण्यासाठी वरच्या भागातील शेतीसाठी ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब केला जावा. यासाठी नगरपालिकेने शेतक-यांना प्रोत्साहन द्यावे.

१४) शासनाकडून विविध मार्गांनी अधिकाधिक अनुदान मिळवून किंवा शासनाच्या विविध विकास योजनांचा लाभ घेण्यात यावा.

१५) नगरपालिका दवाखान्यातील वैद्यकीय अधिका-यांसाठी स्वतंत्र निवासस्थानाची सोय दवाखान्याच्या आवारातच करण्यात यावी.

१६) अधिक प्रभावी व गुणकारी औषधांचा व उपकरणांचा मुबलक पुरवठा दवाखान्यास व रुग्णालयास करण्यात यावा.

१७) गटार सफाई करणा-या कर्मचा-यांच्या संख्येत किमान दुपटीने वाढ करण्यात यावी.

१८) सार्वजनिक संडासांची संख्या (सीटसूंची), तसेच शहराच्या वेगवेगळ्या विभागात त्यांची वाटणी योग्य प्रकारे झाली पाहिजे.

१९) पाटीच्या संडासाचे रुपांतर फ्लशच्या संडासात करताना टाक्यांचे बांधकाम नगरपालिकेने ठरवून दिलेल्या पध्दतीने केले किंवा नाही यावर नगरपालिकेची देखरेख असणे आवश्यक आहे. ठराविक वर्षांनंतर टाक्यांची साफसफाई घर मालकाने नगरपालिकेकडून करवून घेण्याबाबत सक्ती करावयास हवी. नगरपालिकेच्या सार्वजनिक संडासांच्या टाक्यांची सफाई स्वत: नगरपालिकेने वरचेवर करावी. म्हणजे मैलायुक्त पाणी गटाराद्वारे नदीच्या पात्रात मिसळण्याचे टळेल.

२०) वाईतील मैलापाणी व सांडपाणी वाहून नेण्यासाठी सध्याची असणारी गटारांची व्यवस्था अपुरी, दोषपूर्ण व कर्मचाऱ्यांच्या सफाई करण्याच्या क्षमतेपेक्षा अधिक लांबीची असल्याने, लवकरात लवकर शहरासाठी भुयारी गटार योजना कार्यान्वित होणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील कऱ्हाड या अन्य शहरी नगरपालिकेने भुयारी गटार योजना यशस्वीपणे पार पाडली. यावरुन ती स्थानिक नगरपालिकेला आवाक्या बाहेरील वाटू नये. त्यासाठी आवश्यक असणारा निधी शासनाच्या संबंधित विभागाकडून मिळवण्याचा प्रयत्न नगरपालिकेने जारीने करावा.

२१) किमान आणखी एका वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक नगरपालिका दवाखान्यात करण्यात यावी.

२२) सार्वजनिक मुताऱ्यांची संख्या शहराच्या विविध भागात वाढविण्यात येऊन, त्यांची बांधणी अशाप्रकारे व ठिकाणी करण्यात यावी की जेणेकरुन ते मूत्र नदीच्या पात्रात मिसळले जाणार नाही.

या पार्श्वभूमीवर नगरपालिकेचे हिशोब १९७४ पासून व्यवस्थित नसल्यामुळे नगरपरिषदेस मंजूर झालेली रु. ५५ लाख रुपयांची पाणी पुरवठा योजना शासन रद्द करण्याच्या विचारात आहे.[१] विद्यमान नगराध्यक्षांनी दिलेली ही माहिती

म्हणजे नगरपालिकेचा कारभार दिशाहीन पध्दतीने चालला आहे, याची साक्षच आहे.

वाई नगरपालिकेच्या पाणी पुरवठा आणि आरोग्य सेवांच्या कार्यपध्दतीचा हा आढावा नगरपालिकेच्या सरचनात्मक आणि प्रशासकीय मर्यादांचा निर्देश करतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्मितीमागील लोकहिताचा आशय हा शासकीय आणि संस्थात्मक रचनेतून विरळ होतो आहे. हा अनुभव वाई शहरातच येत नाही तर शहरीकरणाच्या लाटेत सापडलेल्या शहरांमधून आणि महानगरातूनही सार्वत्रिक आहे. आज विसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये पर्यावरणाचा प्रश्न हा गंभीर मानला जात आहे. वाढत्या औद्योगिकरणामधून शहरांचा मानवी चेहरा लुप्त होऊन धाईगर्दीचे, हिंसाचाराचे आणि बकालपणाचे नागरी जीवन झाले आहे. वाईसारख्या प्राकृतिक वैशिष्ट्यांनी नटलेल्या शहरामध्ये आरोग्याचे प्रश्न निर्माण होणे हे नगरपालिकेच्या अकार्यक्षमतेचे उदाहरण आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यपध्दतीमधून लोकांचे प्रश्न निकडीने सोडवले जावेत, हा महत्वाचा आग्रह राहिला पण या संस्था आवश्यक नागरी सेवांची पूर्तता करण्यापासून दूर आणि उदासीन राहिलेल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थामधील सशक्त लोकशाही प्रक्रिया हीच आवश्यक नागरी सेवांच्या यशस्वी सोडवणूकीतील पूर्व अट आहे.

दिल्ली येथे सेंट्रल कौन्सिल ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंटच्या १६ व्या परिषदेचे २४ आक्टोबर १९७५ रोजी उद्घाटन करताना तत्कालीन महामंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी व्यक्त केलेले विचार, स्थानिक स्वराज्य संस्थांची आजची अवस्था कशी आहे हे योग्यपणे दाखवितात. त्या म्हणाल्या होत्या की, अधिक स्वच्छ आणि सुनियोजित शहरांच्या वाढीसाठी जरूर तो पाया तयार करण्याऐवजी स्थानिक स्वराज्य संस्था आणि नगर परिषदा हे राजकीय

स्पर्धेचे आणि चर्चेचे अड्डे झाले आहेत. शहरे स्वच्छ, आरोग्यमय आणि सुनियोजित व्हावीत म्हणून भक्कम पाया तयार करण्यासाठी नगरपरिषदांच्या अध्यक्षांनी व सदस्यांनी सामान्य नागरिकांचा सहभाग मिळविला पाहिजे.[२] आणि नेमकी हीच गोष्ट आज होताना दिसत नाही.

संदर्भ

१) दै. सकाळ (पुणे), दि. २३ डिसेंबर १९८७.
२) दै. महाराष्ट्र टाइम्स (मुंबई), दि. २४ आक्टोबर १९७५.